RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक ७] शुक्रवार, जानेवारी १३, २०१७/पौष २३, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १८**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जानेवारी २०१७

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१.**

क्रमांक मत्स्यवि-२०१२/प्र. क्र. १६६/पदुम-१४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (१९८१ चा महा. ५४) अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने कृषि व पदुम विभागाचे आदेश क्र. मत्स्यवि/१०९७/१३३६५/न. क्र. २००/पदुम-१४, दिनांक १२ डिसेंबर १९९७ (यापुढे "उक्त अधिसूचना" संबोधण्यात यावे) अन्वये आदेश निर्गमित केलेले आहेत व महाराष्ट्र शासन कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी विचारात घेऊन व उक्त अधिनियमाच्या कलम ३ पोट-कलम (१) अन्वये रचना करण्यात आलेल्या सल्लागार समित्यांशी विचारविनिमय केल्यानंतर, याद्वारे निदेश देण्यात येत आहेत की, सदर आदेशानुसार ठाणे, बृहन्मुंबई, रायगड, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्याच्या प्रादेशिक सागरी सीमांमध्ये कोणत्याही यांत्रिक मासेमारी जलयानाच्या सहाय्याने मासेमारी करतांना ट्रॉल जाळ्याचा खोल भागाचा आस अनुक्रमे ३५ मि. मि. व २५ मि. मि. पेक्षा कमी ठेवता येणार नाही ;

आणि ज्याअर्थी, राज्या शासनाच्या असे निर्दशानास आले आहे की, सागरी जलधी क्षेत्रामध्ये शास्त्रोक्त पद्धतीने मासेमारी नियंत्रित करणे व छोटे मासे व माशांची पिल्ले यांची मासेमारी टाळणे व या माशांचे जतन करणे आवश्यक आहे ;

आणि म्हणून, महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (१९८१ चा महा. ५४) च्या कलम ४ मधील पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व राज्य शासनाचे कृषि व पदुम विभागाचे आदेश क्र. मत्स्यवि/१०९७/१३३६५/न. क्र. २००/ पदुम-१४, दिनांक १२ डिसेंबर, १९९७ चे आदेश रद्द करून महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी विचारात घेऊन व उक्त अधिनियमाच्या कलम ३ मधील पोट-कलम (१) अन्वये रचना करण्यात आलेल्या सल्लागार समित्यांशी विचारविनियम केल्यानंतर, याद्वारे निर्देश देत आहे की, कोणत्याही यांत्रिक नौकेद्वारे वापरण्यात येणारा ट्रॉल जाळीचा खोलाचा (codend) भाग ४० मि. मी. चौरस आकाराच्या (square) आसांपेक्षा (mesh) कमी असणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चि. नि. सुर्यवंशी,**
शासनाचे सहसचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
Dated the 10th January 2017

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MARINE FISHING REGULATION ACT, 1981.

No. Matsyavi-2012/C.R. 166/ADF-14.— Whereas, by Government Order, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department No. Matsyavi-1097/13365/CR-200/ADF-14, dated 12th December 1997 (hereinafter referred to as "the said notification"), issued in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Marine Fishing Regulation Act, 1981 (Mah.LIV of 1981), the Government of Maharashtra, has, having regard to the matters referred to in sub-section (*2*) of the said the section 4 and after consultation with the Advisory Committee constitued under sub-section (*1*) section 3 of the said Act, directed that no trawl gear having less than 35mm and 25mm mesh, shall be operated by any mechanised fishing vessel, within the territorial waters of Thane, Greater Mumbai, Raigad, Sindhudurg Districts and Ratnagiri District, respectively ;

And whereas, the Government of Maharashtra considers it necessary to regulate fishing on scientific basis so as to conserve fish and to avoid the catch of small fishes and juveniles.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Marine Fishing Regulation Act, 1981 (Mah. LIV of 1981), and in supersession of Government Order, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department, No. Matsyavi-1097/13365/CR-200/ADF-14, dated 12th December 1997, the Government of Maharashtra hereby having regard to the matter referred to in sub-section (*2*) of section 4 of the said Act and after consultation with the Advisory Committees constituted for each coastal Districts under sub-section (*1*) of section 3 of the said Act, directs that, no trawl gear having less than 40 mm square mesh codend, shall be operated by any mechanised fishing vessel.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

C. N. SURYAWANSHI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.